दिनांक:- /०२/२०१९

13 FEB 2019

# " प्रसिध्दीपत्रक "

महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस कर्मचा-यांच्या कामाच्या स्वरुपात बदल झालेला असल्याने पोलीस शिपाई पदावर बुध्दीमान उमेदवारांची निवड होण्याची आवश्यकता, पोलीस शिपाई पदाच्या भरती प्रक्रियेतील शारीरिक चाचणीदरम्यान होणा-या दुर्घटना या बाबी विचारात घेउन शासनाने शासन आदेश, गृह विभाग, क्रमांक-सेप्रनि-१८१८/प्र.क्र.३१३/पोल-५अ, दि.१८.०१.२०१९ व सेप्रनि-१८१८/प्र.क्र. ३८०/पोल-अ, दि.१८.०१.२०१९ अन्वये भरती प्रक्रियेत बदल केलेला आहे. नवीन पध्दतीमुळे पोलीस शिपाई पदाच्या भरती प्रक्रियेत उमेदवारांची लेखी परिक्षा प्रथम घेण्यात येणार आहे. लेखी परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांपैकी पोलीस घटक कार्यलयाच्या आस्थापनेवर रिक्त होणा-या पदांच्या प्रमाणात आवश्यक तेवढयाच योग्य उमेदवारांना शारीरिक चाचणीसाठी बोलाविण्यात येणार असल्याने, भरती प्रक्रिया दीर्घकाळ सुरु न राहता जलद गतीने पार पडेल. त्यामुळे जिल्हयाबाहेरील उमेदवारांना जास्त दिवस ताटकळत रहावे लागणार नाही. भरती प्रक्रियेत केलेल्या बदलांचा फायदा उमेदवारांना निश्चितच होईल.

**(एम. राकेश कलासागर)**
**पोलीस अधीक्षक,अकोला**

**प्रत:-**

........................................

Scanned by CamScanner